मुंबई शिक्षक, मुंबई पदवीधर व कोकण विभाग पदवीधर या तीन विधानपरिषद मतदार संघासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर.

# प्रेस नोट

भारत निवडणूक आयोगाने मुंबई शिक्षक, मुंबई पदवीधर व कोकण पदवीधर विधानपरिषद मतदार संघाची व्दिवार्षिक निवडणूक २०१८ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निदेशाप्रमाणे नामनिर्देशन अर्ज गुरुवार, दिनांक ३१ मे २०१८ पासून गुरुवार दिनांक ०७ जुन, २०१८ पर्यंत सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पहिला माळा, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांच्या दालनामध्ये स्विकारण्यात येतील. प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी शुक्रवार, दिनांक ०८ जुन २०१८ रोजी सकाळी ११.०० पासुन करण्यात येईल. सोमवार, दिनांक ११ जुन २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. सोमवार, दिनांक २५ जून, २०१८ रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत मतदान घेण्यात येईल व गुरुवार दिनांक २८ जुन २०१८ रोजी मतमोजणी घेण्यात येणार आहे. मुंबई शिक्षक, मुंबई पदवीधर व कोकण विभाग पदवीधर विधानपरिषद मतदार संघासाठी आदर्श आचारसंहिता गुरुवार, दि.२४ मे २०१८ पासून अंमलात आलेली आहे. याबाबतीत सर्व जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक व संबंधितांना कळविलेले आहे. आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

मुंबई शिक्षक मतदार संघ, मुंबई पदवीधर मतदार संघ, कोकण विभाग पदवीधर मतदार संघासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त कोकण विभाग हे राहतील. तसेच उप आयुक्त (सामान्य प्रशासन), कोकण विभाग, जिल्हाधिकारी मुंबई शहर व जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा हे सदरच्या निवडणूकीकरीता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहातील. तसेच कोकण विभाग पदवीधर मतदार संघाकरीता उप आयुक्त (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहतील. सदर निवडणूकीचे वेळी सर्व मतदारांनी आपले मतदानाचा हक्क बजाववा असे निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी करीता,
मुंबई शिक्षक, मुंबई पदवीधर व
कोकण विभाग पदवीधर मतदार संघ